# ऋणनिर्देश

मानव हा समाजशील प्राणी आहे असे ॲरीस्टॉटलने म्हटले आहे. तो समूहात राहतो, समूहात वाढतो. आपल्या इच्छा-आकांक्षा, आवड-निवड यानुसार तो जीवन व्यतीत करतो. अगदी याचप्रमाणे एखादा अभ्यासविषय निवडताना अभ्यासकाची आवड महत्वाची असते. माझ्या कुटुंबास शेती, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय पार्श्वभूमी लाभली आहे. परंतु मला शैक्षणिक व राजकीय क्षेत्रांचे आकर्षण असल्याने या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या महान आसामीवर एम.फिल. करण्याचा मी निश्चय केला. शेवटी पूर्ण विचारांती 'अरविंद घोष यांचे शैक्षणिक व राजकीय योगदान' हा विषय शोध प्रबंधसाठी निवडला. माझ्या आवडीनिवडीस माझे मार्गदर्शक डॉ.श्री.के.के. कावळेकर सर यांनी त्वरीत सहमती दर्शवली. सरांची प्रेरणा व जिव्हाळा माझ्या संशोधनकामी अत्यंत चैतन्यदायी ठरला. त्यांनी सुरवातीपासूनच मार्गदर्शन करताना माझ्यावर कृपाछत्र धरल्याने सदर प्रबंध मी चांगल्या प्रकारे पूर्ण करू शकलो. त्याबद्दल सर्वप्रथम त्यांचा ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो.

कोणत्याही विधायक कार्याची पूर्ती मार्गदर्शन व सहकार्याशिवाय शक्य होत नाही. सदर कामी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.श्री.अशोक चौसाळकर सर, डॉ.श्री.लक्ष्मीनारायण तारोडी सर, डॉ.सौ.वासंती रासम मॅडम, डॉ.श्रीमती स्नेहप्रभा नानिवडेकर मॅडम, प्रा.सौ.भारती पाटील मॅडम व कु.सुजाता उदगावे मॅडम या गुरूवर्यांचे अमूल्य मार्गदर्शन व सहकार्य लाभले याचा आवर्जून उल्लेख करतानाच त्यांचे मी अंतःकरणापासून आभार मानतो. तसेच राज्यशास्त्र विभागातील श्री संभाजी तोरस्कर व श्री अरूण वणिरे यांचेही सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो.

सदर शोध प्रबंधाच्या अभ्यासासाठी ग्रंथालयीन पध्दतीचा वापर केल्याने विविध ग्रंथालयांना भेटी द्याव्या लागल्या या कामी बॅ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे मा.ग्रंथपाल व त्यांचे सर्व सहकारी यांनी तसेच शिवाजी विद्यापीठ परिवारातील सर्व पदाधिकारी, अधिकारी, प्राध्यापक, सेवक इ.सर्वांनीच मनापासून सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्टचे चेअरमन आदरणीय पी.डी.पाटीलसाहेब


BARR. ... KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

(माजी आमदार), सेक्रेटरी मा.प्रकाशबापू पाटील यांनी आपले अद्यावत असे ग्रंथालय उपलब्ध करून दिले, आस्थेने चौकशी करून सर्वोतोपरी सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. तसेच या ट्रस्टच्या वेणूताई चव्हाण कॉलेज, कराडचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक विशेषतः प्रा.पी.एम.चव्हाण व प्रा.एस.व्ही.जोशी सरांनी विशेष सहकार्य केले, वेळोवेळी पुस्तके उपलब्ध करून दिली, कार्यास गती देण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रेरणा दिली याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. तसेच ग्रंथपाल मा.डांगे व त्यांचे सहकारी यांनी अतिशय नम्रपणे सहकार्य देऊ केले त्याबद्दल मी त्यांनाही मनापासून धन्यवाद देतो.

रयत शिक्षण संस्थेच्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराडचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक विशेषतः प्रा.डॉ.ए.बी.जगदाळे व प्रा.पी.आर.डांगे सरांनी वेळोवेळी येणाऱ्या शंकाचे निरसन केल्याने कार्यात सातत्य टिकून राहिले. तसेच ग्रंथपाल व त्यांचे सहकारी यांनी चांगले सहाय्य केले त्याबद्दल या सर्वांचाच मी मनापासून आभारी आहे.

प्रबंधपूर्तीच्या कामी मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखेसाहेब (कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर.) यांनी आत्मियतेने चौकशी करून योग्य त्या सूचना करून प्रेरणा दिली त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. तद्वतच मा.प्राचार्य आ.गजेंद्र ऐनापूरेसाहेब (सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर.) यांनी वेळात वेळ काढून आपुलकीने चौकशी करून कार्यपूर्तीची प्रेरणा दिली, उपयुक्त पुस्तकासंबंधी मार्गदर्शन केले व सर्वोतोपरी सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराडचे प्र.प्राचार्य मा.जे.ए.गोरे, त्यांचे सर्व प्राध्यापक, कार्यालयीन सहकारी तसेच प्रा.ए.के.जाधव व प्रा.बी.एस.खोत इ., कॉलेज ऑफ एज्युकेशन, कराडचे प्राचार्य, त्यांचे सर्व प्राध्यापक, कार्यालयीन सहकारी तसेच प्रा.सौ.एस.टी.डुबल व प्रा.सौ.कोमल कळेकर इ., शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगावच्या प्रा.सौ.एम.बी.बोरगे, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबादचे ग्रंथपाल मा.एन.एस.पाटील, महिला महाविद्यालय,कराडचे प्रा.धनाजीराव देसाई, विठामाता विद्यालयाच्या ग्रंथपाल सौ.शशिकला जाधव आणि कराड नगरपरिषदेच्या नगरवाचनालयाचे ग्रंथपाल मा.अशोक आदमणे, लिपिक श्री बाजीराव जाधव यांनी बहुमोल

सहकार्य केले त्याबद्दल या सर्वांना मी मनापासून धन्यवाद देतो.

कोणतेही महत्वाचे कार्य हाती घेताना त्यास कुटुंबाचे पाठबळ असावे लागते. असे झाल्यास कार्यपूर्तीचा मार्ग सुकर होतो. सदर शोध निबंध वेळेत पूर्ण करण्यासाठी व मी खूप शिकावे यासाठी प्रेरणा देणारे माझे सर्व कुटुंबीय विशेषतः वडील श्री गोरखनाथ मारूती जाधव (राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक), व आई सौ.सरस्वती गोरखनाथ जाधव (प्राथमिक शिक्षिका),बहिण सौ.उज्ज्वलादेवी, सौ.वैशाली, भाऊ श्री भालचंद्र, वहिनी प्रा.सौ.विद्या यांचे आशिर्वाद व प्रेरणा ही माझ्या शब्द सामर्थ्याची अक्षय शिदोरी आहे. म्हणून या सर्वांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच राहणे मी अधिक पसंत करेन. तसेच प्रबंध पूर्तीसाठी कुटुंबातील लहान मंडळींनी दिलेल्या सहकार्य व शुभेच्छांबद्दल मी त्यांनाही धन्यवाद देतो. कुटुंबातील सदस्याप्रमाणेच असणारे माझे मित्र श्री मधूसुदन काटवटे (सर) व शिवाजी विद्यापीठातील मित्रवर्यांचे विशेषतः श्री आण्णासाहेब हरदारे व श्री श्रीकांत पाटील यांचे जे सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

सदर शोध प्रबंधाच्या लेखनासंदर्भात मी अनेक मान्यवर लेखकांच्या ग्रंथांचा संदर्भ घेतला आहे. त्यांचा मी नम्रपणे ऋणनिर्देश करीत आहे. अंतिमतः शोध प्रबंधाचा थाटलेला हा प्रपंच अत्यंत तत्परतेने सुबक व आकर्षक स्वरूपात तयार करून देणारे मित्रवर्य श्री मिलिंद भोसले यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच नवरंग मुद्रणालयाचे मालक श्री.सुनिल सरनोबत, तेथील कर्मचारी वर्ग याशिवाय ज्ञात अज्ञातपणे सहाय्यभूत ठरलेल्या सर्व मित्रमंडळींचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

धन्यवाद !

**विनायकराव गोरखनाथ जाधव**

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | अरविंद घोष यांचे जीवन चरित्र | १ ते २९ |
| प्रकरण दुसरे | अरविंद घोष यांच्या शैक्षणिक विचारांची पार्श्वभूमी, विचार व कार्य | ३० ते ५१ |
| प्रकरण तिसरे | अरविंद घोष यांच्या राजकीय विचारांची पार्श्वभूमी व विचार | ५२ ते ११८ |
| प्रकरण चौथे | अरविंद घोष यांचे राजकीय कार्य | ११९ ते १४७ |
| प्रकरण पाचवे | समारोप | १४८ ते १६५ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | १६६ ते १६८ |


****